आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१९ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांनी पदभार स्वीकारला

गेटवे ऑफ इंडिया जवळच्या बोट दुर्घटनेबाबत सरकारने निवेदन द्यावं, असे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश

वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार रवींद्र वायकर यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानावरुन आजही गदारोळ/ दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

संसदेच्या आवारात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची निदर्शनं/ धक्काबुक्कीत भाजपाचे दोन खासदार जखमी

**आणि**

जम्मू - काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबतच्या चकमकीत पाच दहशतवादी ठार

**<><><><><>**

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आज जाहीर केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिंदे यांना सभापतींच्या खुर्चीवर आसनस्थ केलं. शिंदे यांची सभागृहाने एकमताने निवड केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

**<><><><><>**

मुंबईत काल झालेल्या बोट दुर्घटनेप्रकरणी काँग्रेसचे नाना पटोले यांनी आज विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही यावर चर्चा करण्याची तयारी दर्शवली. या घटनेबद्दल सरकारने आजचं कामकाज संपेपर्यंत निवेदन द्यावं, त्यानंतर चर्चा घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. बीड जिल्ह्यातल्या माजी सरपंचांची हत्या आणि परभणीतल्या हिंसाचाराच्या मुद्यावर विधानसभेत चर्चा आज पुन्हा सुरू झाली. सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देत आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. गेल्या अडीच वर्षात राज्याच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन महाराष्ट्र समृद्ध करण्याचं आहे. त्यासाठी आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एकाही पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाही, असा शब्द त्यांनी सर्व महिलांना दिला.

यावेळी त्यांनी राज्याच्या आणि विदर्भाच्या विकासासाठी केलेल्या कामांचा आढावा घेतला. सध्या राज्यात १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामं सुरू आहेत. राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी सात ते

आठ तासांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये असं आमचे नियोजन असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या लोकसभा निवडणुकीत वायव्य मुंबई मतदारसंघातले शिवसेना नेते रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयानं आज फेटाळली. वायकर यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल किर्तीकर यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी ती फेटाळली आहे. मतमोजणीच्या वेळी तथाकथित वादग्रस्त मतं वायकर यांना कशी मिळाली, हे सिद्ध करण्यात कीर्तीकर अपयशी ठरले असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेलं २० टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून केली आहे. नाशिकसह राज्यातल्या शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा तसंच कांद्याला खर्चावर आधारीत चांगला दर मिळावा यासाठी कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क रद्द करणं आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कांद्याचे दर घसरत असल्यानं नाशिक जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडले होते. सकाळी लिलाव सुरू होताच लासलगाव बाजार समितीत कांद्याला कमीत कमी ८०० ते जास्तीत जास्त

२ हजार ९०० दर मिळाला. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले आणि लिलाव बंद पाडले. कांदा निर्यातीला प्रोत्साहन द्यावे, निर्यात शुल्क रद्द करावे अशा शेतकऱ्यांच्या मागण्या आहेत. आज सकाळी सुमारे अर्धा तास शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यानंतर बाजार समितीच्या मध्यस्थीने लिलाव पूर्ववत सुरू झाले. मात्र, भावात फार सुधारणा झाली नाही. गेल्या गुरूवारी लासलगाव बाजार समितीत ३६०० रूपये प्रति क्विंटल असे भाव मिळाले होते.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरुन आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ झाला. घोषणाबाजीमुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेत कामकाज सुरु झाल्यावर काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, आणि इतर पक्षांचे सदस्य अमित शाह यांच्या विरोधात घोषणा देऊ लागले. काही सदस्य सभापतींसमोरच्या मोकळ्या जागेत शिरले. घोषणा चालूच राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी आधी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतरही गदारोळ चालूच राहीला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत या आणि इतर विषयावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात काँग्रेस, द्रमुक, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, राजद, आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. गोंधळ वाढतच गेल्यामुळे अध्यक्षांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. नंतरही घोषणा चालूच राहिल्याने कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या समर्थनार्थ, तसंच काँग्रेसनं बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप खासदारांनी आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली. भाजपा सदस्यांनी हातात फलक घेत घोषणाबाजी केली. नेहरु- गांधी परिवारानं नेहमीच आंबेडकरांचा अपमान केल्याचा आरोप माजी केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी बातमीदारांशी बोलताना केला.

दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याबाबत विरोधी पक्षांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. शाह यांनी माफी मागावी अशी मागणी करत काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, डावे पक्ष आणि इतर पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात मोर्चा काढला. या निदर्शनांमधे धक्काबुक्की होऊन भाजपाचे प्रताप सरंगी आणि मुकेश राजपूत जखमी झाले. त्यांना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आलं. आपल्याला राहुल गांधी यांचा धक्का लागल्याचा आरोप सरंगी यांनी केला आहे. संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. या धक्काबुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. या प्रकाराची सविस्तर चौकशी करण्याची मागणी त्यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडे केली.

**<><><><><>**

महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय सर्व समित्या तत्काळ प्रभावाने विसर्जित करण्यात आल्या आहेत. संघटनात्मक

बांधणी मजबूत करण्यासाठी आणि राज्यात महिला काँग्रेसच्या सदस्यत्व मोहिमेला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांच्या पत्रकात म्हटलं आहे. महिला प्रदेशाध्यक्षा म्हणून संध्या सव्वालाखे या कायम राहणार आहेत.

**<><><><><>**

गेटवे ऑफ इंडियापासून घारापुरीला जाणारी बोट उलटून काल झालेल्या अपघातात मृतांची संख्या तेरा झाली असून बेपत्ता असलेल्या दोघांचा शोध सुरु आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना दोन लाख तर जखमींना पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपये मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या सारंगखेडा इथला अश्वमहोत्सव हा कार्यक्रम आकर्षणाचा विषय आहे. अश्वनृत्य स्पर्धेने या महोत्सवाची सुरूवात झाली आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून………………

**बाईट- निलेश पवार…..**

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार झाले. या मोहिमेत भारतीय लष्कराचे दोन जवानही जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे

**<><><><><>**

अमेरिकेच्च्या फेडरल रिझर्व्हनं व्याजदरात पाव टक्के कपात करण्याचा निर्णय काल रात्री घेतला आहे. प्रमुख व्याजदर सव्वाचार ते साडेचार टक्क्यांच्या दरम्यान ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचं फेडरल रिझर्व्हने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या निर्णयामुळे अमेरिकेच्च्या शेअर बाजाराच्या तिन्ही प्रमुख निर्देशांकात घट झाली आहे.

या निर्णयाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झालेला दिसून येत आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स निर्देशांकात आज सुमारे आठशेहून अधिक अंकांची घसरण दिसून आली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २००हून अधिक अंकांनी घसरला आहे. ही घसरण दुपारच्या सत्रापर्यंत कायम आहे.

**//<><><><><>//**